जा.क्र.नांवाशमनपा/नसका/सिआर-34/2021
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक:- 27.01.2021

<u>दिनांक 29.01.2021 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपा सर्वसाधारण सभेची पुरवणी विषय पत्रिका</u>

<u>आयुक्त यांच्याकड्न प्राप्त कार्यालयीन प्रस्ताव</u>

**विषय क्रं. 01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/10240/21 दिनांक 18.01.21 अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-1319/प्र.क्र. 13/सेवा-9 दिनांक 08 जुलै 19 नुसार राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता लागु आहे अशा वेतनधारकांना 01 जानेवारी 2019 पासुन मुळ वेतनावरील अधिक ग्रेड वेतन यावर 154% दराने महागाई भत्ता वाढ मंजुर करावी व दिनांक 01 जानेवारी 2019 ते 30 जुन 2019 या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमीत करण्यात येईल असा शासन निर्णय होता त्यानुसार मनपाकेतील कर्मचा-यांना कार्यालय पत्र क्रं. नावाशमनपा/लेवि/3404 दिनांक 09.07.19 नुसार माहे जुलै 19 पासुन 154% महागाई भत्ता लागु करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रं. मभ्वा-2019/प्र.क्र.13/सेवा-9 दिनांक 14 जानेवारी 2021 अन्वये दिनांक 01 जानेवारी 19 ते 30 जुन 19 या कालावधीतील महागाई भत्ताच्या थकबाकीची रक्कम रोखीने देणे बाबत शाससन निर्णय पारीत झाल्यानुसार मनपाकेतील कर्मचा-यांना उक्त कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम मनपाकेच्या आथर्भ्क परिस्थितीनुसार अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली **त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.** यावर लागणारा खर्च अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 02**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/102401/21 दिनांक 18.01.21 अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-1319/प्र.क्र. 13/सेवा-9 दिनांक 08 जुलै 19 नुसार दिनांक 01 जानेवारी 19 पासुन 7व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनसंरचनेतील मुळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्याचा दर 9% वरुन 12% करण्यात आला आहे व दिनांक 01 जानेवारी 19 ते 30 जुन 19 या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमीत करण्यात येईल असा शासन निर्णय होता. त्यानुसार महानगरपालिकेतील **प्रतिनियुक्ती अधिकारी वर्ग** यांना कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/लेवि/3403 दिनांक 09.073.19 नुसार माहे जुलै 19 पासुन 12% महागाई भत्ता लागु करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रं. मभ्वा-2019/प्र.क्र.13/सेवा-9 दिनांक 14 जानेवारी 21 अन्वये दिनांक 01 जानेवारी 19 ते 30 जुन 19 या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम रोखीने देणे बाबत शासन निर्णय पारीत झाल्यानुसार महानगरपालिकेतील प्रतियिुक्ती अधिकारी वर्ग यांना उक्त कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली **त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत.** यावर लागणारा खर्च अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 03**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/लेवि/10242/21 दिनांक 18.01.21 अन्वये शासन निर्णय क्रं. मभवा-313//सेवा-4 दिनांक 29 ऑगस्ट 19 नुसार निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्ती वेतन घेणा-या राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना महागाई भत्याचा दर दिनांक 01 जानेवारी 19 पासुन मुळ 154% दराने महागाई भत्ता वाढ मंजुर करावी व दिनांक 01 जानेवारी 19 ते 30 जुन 19 या कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीच्या आहरणाबाबत स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करण्यात येईल

असा शासन निर्णय होता. त्यानुसार मनपाकेतील निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्ती वेतन घेणा-या वेतनधारकांना जा.क्रं. नावाशमनपा/लेवि/5513 दिनांक 26.08.13 नुसार माहे जुलै 19 पासुन 154% महागाई भत्ता लागु करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रं. निमभा-2019/प्र.क्र.313/सेवा-4 दिनांक 14 जानेवारी 21 अन्वये दिनांक 01 जानेवारी 2019 ते 30 जुन 2019 या कालावधसीतील महागाई भत्ताच्या थकबाकीची रक्कम रोखीने देणे बाबत शासन निर्णय पारीत झाल्यानुसार मनपाकेतील निवृत्तीवेतन / कुटूंब निवृत्ती वेतनधारकांना उक्त कालावधीतील महागाई भत्याच्या थकबाकीची रक्कम महानगरपालिकेच्या आर्थीक परिस्थितीनुसार अदाई करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यता प्रदान करण्यात आली त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत. यावर लागणारा खर्च अंदाजपत्रकातील संबंधीत शिर्षकातुन करण्यात यावा.

**विषय क्रं. 04**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत अंतर्गत नागरिकांना सुविधा पुरविणे करिता JNNURM, नगरोत्थान (रस्ते, पुल, नाले) बिएसयुपी, पाणी पुरवठा (देखभाल), मलनिस्सारण (उभारणी व देखभाल) इत्यादी योजने अंतर्गत कामे चालु असल्यामुळे सदर कामासाठी उपलब्ध कर्मचारी वर्ग अपुरा असल्यामुळे विविध विकास कामे नियोजीत वेळेत पुर्ण होणे करिता तसेच सदरचे कामावर व कामाच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवणेकरिता तसेच गुंठेपवारी, विधुत व यांत्रिकी विभागासाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पदे भरण्यासाठी मनपा सर्वसाधारण ठराव क्रं. 136 दिनांक 30.12.2010 अन्वये उक्त योजना व विविध विभागासाठी कंत्राटी उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हि पदे ठरावातील नमुद कालावधीकरिता नमुद अर्हता, दरमहा एकत्रित वेतनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पदे भरण्यासाठी मान्यता प्रदान केल्यानुसार विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन सदरची कंत्राटी पदे भरण्यात आली.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्रं. 11 दिनांक 02.08.2013 अन्वये उकत ठरावातील नमुद सर्व कंत्राटी पास मान्यता देवुन कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवेस दर 06 महिण्याला एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन योजना संपेपर्यंत मुदतवाढ देणेबाबत मान्यता प्रदान करण्यात आली. संबंधीत विभागप्रमुखांच्या अहवालानुसार सर्व संबंधीतांना वरील प्रमाणे वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. उक्त ठरावातील नमुद योजना संपल्या असुन संबंधीत विभागप्रमुखांच्या अहवालानुसार महापालिकेच्या इतर योजनांची तदअनुषंगिक कामे करण्यासाठी सध्या कार्यरत असलेल्या खालील नमुद कंत्राटी उपअभियंता-2, कनिष्ठ अभियंता-13 व स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक-24 व कंत्राटी कुस्ती शिक्षक-02 यांना मुदतवाढ देणे बाबतचा प्रशासकीय प्रस्तावव क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/3529/20 दिनांक 29.07.20 च्या प्रशासकीय प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/4132/20 दिनांक 10.08.20 अन्वये दिनांक 30.06.20 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.07.20 ते 30.12.20 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

विविध विभागांना कार्यालयीन पत्र क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/8383/20 दिनांक 03.12.20 अन्वये संबंधीत विभागाचा अहवाल मागवला असुन संबंधीतांच्या कामाची आवश्यक्ता व त्यांचे काम समाधानकारक असल्याच्या अहवालानुसार पुढील मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

करिता खालील कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवेची मुदत दिनांक 30.12.2020 रोजीसंपत असल्यामुळे त्यांच्या कंत्राटी सेवेत दिनांक 31.12.20 रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक 01.01.2021 ते 29.06.2021 पर्यंत मुदतवाढ देण्याबाबत विभागप्रमुखांच्या अहवालानुसार प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कंत्राटी कर्मचा-यांचे नांव | पदाचे नांव | एकत्रीत वेतन रुपये | तांत्रीक खंड दिनांक | कार्यरत विभागाचे नांव |
|---|---|---|---|---|---|
| **पदाचे नांव – कंत्राटी उप अभियंता - 02** | | | | | |
| 01 | श्री विजयकुमार शेषेराव दवणे | कंत्राटी उप अभियंता | 22,000/- | 31.12.2020 | स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष (ना) |
| 02 | श्री संघरत्न गणपतराव सोनसळे | कंत्राटी उप अभियंता | 22,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| **पदाचे नांव – कंत्राटी कनिष्ठ अभियंता - 13** | | | | | |
| 01 | म. जकीउल्ला खान | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | पाण पुरवठा विभाग |
| 02 | सय्यद युनूस मोईनोद्यीन | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | विधुत विभाग |
| 03 | बोडके राजकुमार गंगाराम | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभाग |
| 04 | अंजनडोहकर राहुन माधवराव | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | विधुत विभाग |
| 05 | सरपाते रविंद्र संभाजीराव | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | नगररचना विभाग |
| 06 | सुर्यवंशी किरण नामदेवराव | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 07 | स्वामी उत्तम गुरुनाथ | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | झोन क्रं. 03 पापु मलनिस्सारण विभाग |
| 08 | संदिप ज्ञानोबा पाटील | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 09 | ठाणेदार म. खिजर, म. मुस्तफा | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | बिएसयुपी विभाग |
| 10 | कु. सुपिया शंकरराव मुलंगे | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 11 | व्यंकटेश गोपिचंद गोकुळे | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | यांत्रीकी विभाग |
| 12 | शेख जैनोद्यीन हुसेन साब | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 13 | संग्राम जिवनराव गाडेगांवकर | कंत्राटी कनिष्ठ अभियंता | 18,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा व मलनिस्सारण विभाग |
| **पदाचे नांव – कंत्राटी स्थापत्य अभियांत्रीकीमार्ग लिपीक) - 24** | | | | | |
| 01 | प्रतिभाग कसबे | कंत्राटी स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| 02 | कल्पना बहातरे | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| 03 | पिसाळ मुंजाजी सुभाष | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | झोन क्रं. 1, 2, 3 मलनिस्सारण विभाग |
| 04 | गजभारे सचिन | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| 05 | क्षीरसागर योगेश गोवर्धन | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 06 | ढाले शिवाजी अमृता | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पापु व मलनिस्सारण विभाग |
| 07 | वंजे रामराव नारायणराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| 08 | वाघमारे चंपत सखराम | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | क्षे.का.क्रं. 01 तरोडा-सांगवी |
| 09 | बळवंते संभाजी भुजंगा | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | क्षेत्रीय कार्यालय क्रं. 03 शिवाजीनगर |
| 10 | पांचाळ गोविंद मनोहर | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | क्षे.का.क्रं. 01 तरोडा-सांगवी |
| 11 | कुलकर्णी नेहा | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | प्रधानमंत्री आवास योजना |
| 12 | कांबळे अन्नपुर्णा बाबुराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 13 | चवरे संजय केशवराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | बिएसयुपी विभाग |
| 14 | डुकरे किशन बापुजी | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | पाणी पुरवठा विभाग |
| 15 | अंकमवार जयश्री नारायण | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | प्रधानमंत्री आवास योजना |
| 16 | कांबळे रमाबाई नागोराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 17 | गड्डीमे महेश किशनराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | क्षेत्रीय काय्ारलय क्रं. 03 शिवाजीनगर |
| 18 | शरद अशोकराव काळे | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | स्वच्छ महा. अभि (ना) कक्ष |
| 19 | तारु लक्ष्मण भिवाजी | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | सार्वजनिक बांधकाम विभाग |
| 20 | सर्जे गजानन रामकिशन | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | प्रधानमंत्री आवास योजना |
| 21 | ढवळे मनिषा वामनराव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | क्षे.का.क्रं. 05 इतवारा |
| 22 | लबासे छाया महादेव | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | प्रधानमंत्री आवास योजना |
| 23 | अजय अशोकराव गायकवाड | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | मलनिस्सारण विभाग |
| 24 | शिवपुरे भरत मोहन | -- DO -- | 11,000/- | 31.12.2020 | अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम विभाग |
| **पदाचे नांव – कंत्राटी / मानधनावरील – कुस्ती शिक्षक - 2** | | | | | |
| 01 | बालाजी मुकूंदलाल यादव | कुस्ती शिक्षक | 20,000/- | 31.12.2020 | स्टेडीयम विभाग |
| 02 | अहेमद अली अकबर अली | कुस्ती शिक्षक | 20,000/- | 31.12.2020 | स्टेडीयम विभाग |

वरीलप्रमाणे कंत्राटी उपअभियंता-02, कंत्राटी कनिष्ठ अभियंता-13, कंत्राटी स्थापत्य अभियात्रिकी सहाय्यक (मार्ग लिपीक)-24 व कंत्राटी कुस्ती शिक्षक-2 यंचे सेवेस त्यांचे नावासमोर दर्शविल्यानुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दिनांक 01.01.2021 ते 29.06.2021 पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 05**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रस्तावित वाढीव विकास आराखडयातील दफन भुमी आरक्षण क्रं. 116 मौजे म्हाळजा सर्वे नं. 19 मधील जागा संपादन करणे बाबत**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील नांदेड उत्तर व दक्षिण भागातील फारुखनगर, महेबुबनगर, सेलानीनगर, ताजनगर, हैदरबाग, इस्लामपुरा या भागात बहुसंख्य मुस्लीम बांधव राहतात.

या भागातील मुस्लीम बांधवाकरिता दफनभुमी नाही. वरील भागातील मुस्लीम बांधव नवी आबादी येथील दफनभुमीचा वापर करतात. सदर दफनभुमी या भागापासुन अंदाजे 03 ते 04 कि.मी. आहे.

प्रस्तावित वाढीव विकास आराखडयात मौजे म्हाळजा येथील सर्व्हे नं. 19 मध्ये दफनभुमी रिता आरक्षण क्रं. 116 अन्वये 0.32 हेक्टर जागा आरक्षित करण्यात आलेली आहे सदर जागा दफनभुमीसाठी संपादन करणे आवश्यक आहे.

करिता सदर जागेच्या संपादनासाठी व विकसित करण्यासाठी लागणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थीक मान्यतेस्तव प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**विषय क्रं. 06**

**विषय :- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करणे बाबत**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड हद्यीतील खालील रस्ते महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं. रावियो-2020/प्र.क्र.99/नियोजन-2/ दिनांक 11.12.2020 अन्वये साव्रजनिक बांधकाम विभाग नांदेडकडे हसतंतारीत करण्यात आले आहेत.

01 जुना मोंढा – गोदावरी पुल –डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक

02 नांदेड लातुर राममा – 361 - भगतसिंग चौक - असर्जन चौक – पश्चिम वळण रस्त्यावरील नवीन गोदावरी पुल

03 महाराणा प्रताच चौक ते हिंगोली गेट रेल्वे भुयादी पुल रामा – 61 चा भाग (भुयारी पुलासह)

03 रेल्वे स्टेशन – देगलुर नाका – जुना गोदावरी पुल – वाजेगांव रस्ता प्रामा – 2 चा भाग

वरील रस्ता क्रं. 01 व 02 यांना जोडणारा डीआयजी ऑफीस (नवीन कौठा) – होळकर चौक – भगतसिंग चौक पर्यंतचा 1630 मी. लांबीचा अस्तित्वातील डांबरी रस्ता आहे.

तसेच डीआयजी आफीस (नविन कौठा) – होळकर चौक – भगतसिंग चौक या रस्त्यावरील बॉम्ब शोध पथक कार्यालय समोरुन जिवाजी महाले चौक (मामा चौक) – पश्चिम वळण रस्त्यापर्यंतचा 1430 मी. लांबीचा अस्तित्वातील डांबरी रस्ता आहे. सदर रस्ता हा शासकीय कार्यालय व वसाहात या जागे लगतचा रस्ता असुन पश्चिम वळण रस्त्याला मिळणारा रस्ता आहे.

वरील अ.क्रं. 01 व 02 दोन्ही मुख्य रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले असल्यामुळे या रस्त्यांना जोडणारे उपमुख्य रस्ते (1) डीआयजी ऑफिस (नविन कौठा) होळकर चौक – भगतसिंग चौक पर्यंत व (2) बॉम्ब शोध पथक कार्यालय – जिवाजी महाले चौक (मामा चौक) – पश्चिम वळण रस्ता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेडकडे हस्तांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

तसेच वरील अ.क्रं. 03 व 04 दोन्ही मुख्य रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आले असल्यामुहे या रस्त्याला जोडणारा मुख्य रस्ता अणाभाऊ साठे चौक – खालसा RUB – देगलुर रोड पर्यंतचा 24 मी. रुंदीचा व 690 मी. लांबीचा रस्ता महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेडकडे हस्तांतरीत करण्यासाठीचा प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभे समोर सादर.

**विषय क्रं. 07**

नांदेड वाघाळा शहर महानरपालिका कर्मचारी निवड समितीने निव्वळ तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात विहीत कालावधीसाठी पंपचालक/हाप्से दुरुस्ती या पदासाठी प्रतिमहा एकत्रीत वेतन रु.2500/- प्रमाणे नियुक्तीसाठी निवड करुन शिफारस केलेल्या उमेदवारांच्या यादीस व नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभा दिनांक 16.08.2007 रोजीचा ठराव क्र.122 नुसार कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/आस्था-5/7803/2007 दिनांक 18.08.2007 अन्वये 12 उमेदवारांना निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम सहा महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमहा एकत्रीत वेतनावर नेमणुक करण्यात आली होती. तसेच आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/6821/08 दि.14.11.2008 अन्वये महानगरपालिका क्षेत्रात नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पाण्याच्या टाक्यासाठी पंपचालकांची अतिरीक्त गरज पाहता प्रतिक्षा यादीवरील श्री लिमकर प्रदिप दामोधर यांना आदेशाच्या दिनांकापासुन प्रथमतः सहा महिन्याच्या कालावधीकरीता प्रतिमहा एकत्रीत वेतनावर नेमणुक देण्यात आली आहे.

मा.प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई यांना कार्यालयीन प्रस्ताव पत्र क्र.मनपा/ साप्रवि/आस्था-5/10454/09 दि. 13.03.2009 अन्वये पाठवुन नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका अभियंता आस्थापनेवर पाणी पुरवठा विभागासाठी (12) पंप चालकांच्या पदनिर्मितीस कायमस्वरुपी मान्यता प्रदान करणेसाठी विनंती करण्यात आली होती.

मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.36 दि.20.05.2010 नुसार पाणी पुरवठा विभागातील एकत्रित वेतनावरील एकुण (12) पंप ऑपरेटर यांच्या सेवेस महाराष्ट्र शासनाकडुन मान्यता प्राप्त होईपर्यंत एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देण्याची मान्यता प्रदान केली होती.

मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचे पत्र क्रंमाक नामपा-2018/प्रक्र433/नवि-24 दि. 14.02.2019 अन्वये दि.13.03.2009 च्या प्रस्तावानुसार पंप ऑपरेटर संवर्गात आणखी 12 पदे निर्माण करण्याची आवश्यकता नाही, असे कळविले आहे.

त्यानुसार कार्या. प्रस्ताव क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/371/20 दि.28.04.2020 अन्वये कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी दिनांक 12.12.2019 रोजी दिलेल्या अहवालानुसार एकत्रीत वेतनावरील (11) कंत्राटी पंप ऑपरेटर यांच्या सेवेची आवश्यकता लक्षात घेता संबंधितांच्या सेवेत दिनांक 31.12.2019 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 01.01.2020 ते 29.06.2020 पर्यंत मुदतवाढ देणेसाठी दि. 28.04.2020 रोजी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास सभेची मान्यता अद्याप अप्राप्त आहे.

दिनांक 28.04.2020 च्या प्रस्तावास मनपा सर्वसाधारण सभेची मान्यतेच्या अधिन राहुन कार्यालयीन आदेश क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/372/20 दि. 28.04.2020 अन्वये पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत एकत्रित वेतनावरील कंत्राटी पंप ऑपरेटर यांच्या सेवेस दि. 30.12.2019 रोजी मुदतवाढ संपली असल्यामुळे दि. 31.12.2019 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. 01.01.2020 ते 29.06.2020 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

तसेच कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी दिनांक 26.05.2020 रोजी दिलेल्या अहवालानुसार कार्यालयीन प्रस्ताव क्र.नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/2348/20 दि. 30.06.2020 अन्वये एकत्रीत वेतनावरील (11) कंत्राटी पंप ऑपरेटर यांच्या सेवेची आवश्यकता लक्षात घेता संबंधितांच्या सेवेत

दिनांक 30.06.2020 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 01.07.2020 ते 30.12.2020 पर्यंत मुदतवाढ देणेसाठी दि.30.06.2020 रोजी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास सभेची मान्यता अद्याप अप्राप्त आहे.

दिनांक 30.06.2020 च्या प्रस्तावास मनपा सर्वसाधारण सभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कार्यालयीन आदेश क्र. नांवाशमनपा/साप्रवि/आस्था-5/4131/20 दि. 10.08.2020 अन्वये पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत एकत्रित वेतनावरील कंत्राटी पंप ऑपरेटर यांच्या सेवेस दि. 29.06.2020 रोजी मुदतवाढ संपली असल्यामुळे दि. 30.06.2020 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देवुन दि. 01.07.2020 ते 30.12.2020 पर्यंत पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार प्रतिमहा एकत्रित वेतन रु.11000/- यावर मुदतवाढ देण्यात आली आहे.

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी दि. 07.12.2020 रोजी दिलेल्या अहवालानुसार कार्यरत कंत्राटी/ एकत्रीत वेतनावरील (11) पंप ऑपरेटर हे पाणी पुरवठा विभागांतर्गत सिडको, असदवन, डंकीन, काबरानगर जलशुध्दिकरण केंद्र, आसना व काळेश्वर पंप हाऊस येथे पंप चालविण्याचे काम चांगल्याप्रकारे करीत असल्यामुळे त्यांना सेवेत मुदतवाढ देणेसाठी दिलेल्या अहवालानुसार संबंधितांच्या सेवेस दि. 30.12.2020 रोजी मुदतवाढ संपत असल्यामुळे दि. 31.12.2020 रोजीचा एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दि. 01.01.2021 ते 29.06.2021 पर्यंत पुर्वीच्याच अटी व शर्तीनुसार प्रतिमहा एकत्रित वेतन रु. 11000/- यावर मुदतवाढ देणेसाठी प्रस्ताव मनपा सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**विषय क्रं. 08**

**विषय :- <u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील फुलेनगर ते रस्ता क्रं. 07 पर्यंत रस्ता रुंदीकरणे करणे बाबत</u>**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या तसेच शहराचा होत असलेला सर्वांगीण विकास विचारात घेता सुरक्षित व सुरळीत वाहतुकीच्या दृष्टीने शहरात नव्याने पर्यायी रस्ता तसेच अस्तित्वातील रस्त्यांचे रुंदीकरणे करणे आवश्यक आहे.

शहराच्या शिवाजीनगर मागील घामोडीया फॅक्टरी डॉक्टर लेन परिसरात मोठया प्रमाणावर आरोग्य विषयक सोईसुविधा विकसित होत असुन सदर सुविधांचा लाभ घेण्यासाठी जिल्हयातील व जिल्हयाबाहेरील नागरीक दररोज मोठया संख्येने याठिकाणी येत आहेत. वजिराबाद परिसरातुन सदर परिसरात जाण्यासाठी शिवाजीनगर पुलावरुन एक मार्गी वाहतुक व्यवस्था अस्तित्वात असुन बाहेर पडण्यासाठी शिवाजीनगर हनुमान मंदिरासमोरील एक मार्गी रस्ता व फुले नगर ते रस्ता क्रं. 07 हा द्विमार्गी रस्ता असे पर्याय आहेत. यातील द्विमार्गी रस्ता फुलेनगर ते रस्ता क्रं. 07 हया रस्त्यांची रुंदी 7.90 ते 8.90 मी. असुन रुंदी कमी असल्याने व वाहतुकीची तिव्रता विचारात घेता याठिकाणी वेळोवेळी वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. त्यामुळे सदर रस्त्याचे रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

यादृष्टीने सदर रस्ता क्रं. 07 ते फुलेनगर कडे जाणा-या रस्त्याच्या उजवीकडील बाजुची जागा महापालिका मालकीची असल्याने तसेच जनता मार्केटच्या इमारतीचा पुर्नविकास करावयाचा असल्याने या बाजुने एकूण 16.00 मी. रुंदीमध्ये रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. यानुसार सदर रस्त्याचे रुंदीकरणे करणे व रस्ता विकसित करण्यासाठी लागणा-या खर्चाचा प्रस्ताव मान्यतेस्तव मनपा सर्वसाधारण सभेसमोर सादर.

**स. सदस्या मार्फत आलेले प्रस्ताव/सुचना**

**विषय क्रं. 09** **प्रस्ताव**

मनपा हद्यीतील जुना कौठा येथील बौध्द विहाराचे काम पूर्ण झालेले आहे पण रस्ता नाही जमीन रस्त्यासाठी संपादीत करण्यासाठी आवश्यक्ता वाटली तर जमीन संपादीत करण्यात यावे.

तसेच गोवर्धन घाट ते कौठा अंतर्गत जाणा-या ब्रिजच्या कडेने 20 फुटचा रस्ता बौध्द विहारासाठी मोकळा करुन रस्ता करण्यास हि मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता देते.

**सुचक** :- राजु गोविंबराव काळे **अनुमोदक** :- दिपाली संतोष मारे

**विषय क्रं. 10** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत श्री साईराज सत्यनारायण मुदिराज लिपीक यांना अचानक झालेल्या पोटदुखीच्या ( अक्युट पॅनक्रियाटायटीस) व सिझ डिसऑर्डरच्या त्रासावर उपचाराकरिता अश्वीनी क्रिटीकल अन्ड हार्ट केअर सेंटर प्रा.लि. नांदेड येथे दिनांक 13.01.20 रोजी दाखल करण्यात आले व त्यानंतर सदर रुग्णालयातील डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे व त्यांनी संदर्भीत केल्यानुसार पुढील उपचार ए.आय.जी. हॉस्पीटल हैद्राबाद (तेलंगाना राज्य) येथे दिनांक 14.01.2020 ते 23.01.2020 पर्यंत करण्यात आले असुन या आंतररुग्ण कालावधीमध्ये त्यांचेवर उपचारार्थ एकूण रुपये 1,65,380/- (अक्षरी रुपये एक लक्ष पासष्ट हजार तीनशे ऐंशी केवळ) एवढा खर्च झाला असुन त्यांचे पुढील उपचार देखील हैद्राबाद येथील रुग्णालयामध्ये सुरु असुन त्यासाठी देखील आणखी खर्च लागणार आहे. त्याकरिता संबंधीतांना पैशांची आवश्यक्ता असल्याने संबंधीतांचे आंतररुग्ण कालावधीतील रुपये 1,65,380/- (अक्षरी रुपये एक लक्ष पासष्ट हजार तीनशे ऐंशी केवळ) या उपचारार्थ खर्च झालेल्या रक्कमेच्या प्रतिपुर्तीस विशेष बाब म्हणुन मंजुरी प्रदान करुन संबंधीतांना रक्कम अदाई करण्यास ही मनपा सर्वसाधारण सभा सर्वानुमते मान्यता प्रदान करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- सौ. दिपाली संतोष मोरे **अनुमोदक** :- नागनाथ गड्डम

**विषय क्रं. 11** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील सिडको येथील बंद पडलेल्या STP च्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत प्रस्ताव तयार करुन पाठविणे बाबत.

**सुचक** :- जाधव श्रीनिवास **अनुमोदक**:- स. विरेंद्रसिंघ गाडीवाले

**( मा. महापौर यांच्या मान्यतेने )**

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव**
**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**